जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JAN 2018
महाराष्ट्र टाईम्स

# वाहनचालकांचा विद्यापीठात सत्कार

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'तुमचे दक्ष हात आणि नजर माझी काळजी घेत असल्यामुळेच माझे कुटुंब निश्चिंत आहे. आपण घेत असलेल्या काळजीविषयी कृतज्ञ आहे,' अशी हृद्य भावना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केली. निमित्त होते रस्ते सुरक्षा सप्ताहानिमित्त विद्यापीठातील अधिकाऱ्यांच्या वाहनचालकांच्या सत्काराचे. रस्ते सुरक्षा सप्ताहानिमित्त कुलगुरू कार्यालयात कार्यक्रम झाला. विद्यापीठातील अधिकाऱ्यांचे सर्व वाहनचालक यावेळी उपस्थित होते.



कुलगुरूंच्या हस्ते शाल व ग्रंथभेट देऊन वाहनचालकांचा सत्कार करण्यात आला. यात आनंदा लोखंडे, बबन पाटील, मधुकर कुंडल्ये, सदानंद लोखंडे, प्रल्हाद गंगाधरे, शिवाजी शिंदे आणि अजित पाटील यांचा समावेश होता. कुलगुरूंसमवेत प्रवासात सोबत करणारे सुरक्षा रक्षक किरण पवार यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. श्री. कुंडल्ये यांनी सर्वांच्या वतीने सत्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. वाहनचालकांसाठी अशा प्रकारचा सत्कार समारंभ आयोजित केल्यामुळे भारावून गेल्याची भावना त्यांनी बोलून दाखविली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, वक्तशीरपणा, निर्व्यसनीपणा आणि विश्वासार्हता हे विद्यापीठाच्या सर्वच वाहनचालकांचे सदगुण आहेत. आपले काम, आपले विद्यापीठ आणि आपले अधिकारी यांच्याविषयीचे त्यांच्या मनातील प्रेम त्यांच्या वर्तनातून दिसत असते. आमचे जीवन त्यांच्या हातात असल्याची जाणीव त्यांना सदोदित असते. त्यामुळे वाहनाची स्वच्छता, मेंटेनन्स याबाबत ते सदैव सतर्क असतात. सातत्याने प्रवास करीत असताना केवळ या वाहनचालकांच्या विश्वासावरच प्रवास सुरक्षित होतो.'

प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी.आर. मोरे, अधिष्ठाता डॉ. पी.डी. राऊत, डॉ. भारती पाटील, डॉ. ए.एम. गुरव, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, अभियांत्रिकी विभागाचे उपकुलसचिव डॉ. जी.एस. कुलकर्णी, एनएसएस समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी.टी. गायकवाड, वैद्यकीय अधिकारी डॉ. विनिता रानडे, वाहन विभागाचे सहायक कुलसचिव डॉ. यू.के. सकट आदी उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याहस्ते वाहनचालकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी (उजवीकडून)आनंदा लोखंडे, बबन पाटील, मधुकर कुंडल्ये, सदानंद लोखंडे, शिवाजी शिंदे, प्रल्हाद गंगाधरे, अजित पाटील व कुलगुरूंचे सुरक्षारक्षक किरण पवार.

16 JAN 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बाळशास्त्री जांभेकर यांचे कार्य प्रेरणादायी

प्रतिनिधी
कोल्हापूर

मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांनी ज्ञानसंपादन, ज्ञाननिर्मिती आणि ज्ञानप्रसाराच्या क्षेत्रात अभूतपूर्व कामगिरी बजावली. त्यांचे कार्य आजच्या पत्रकारितेला ऊर्जा प्रदान करणारे ठरत आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधी यांच्यातर्फे 'दर्पण"कार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मरणार्थ आयोजित राज्यस्तरीय पत्रकार दिन व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पत्रकारांचा गौरव समारंभ पोंभुर्ले (ता. देवगड)या बाळशास्त्रींच्या जन्मगावी 'दर्पण" सभागृहात झाला.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, बाळशास्त्रींनी वृत्तपत्राकडे लोकशिक्षणाचे, समाजजागृतीचे व लोकसंवादाचे एक प्रभावी साधन म्हणून पाहिले. हे एक अत्यंत शक्तीशाली, प्रभावी माध्यम असल्याची जाणीव त्यांना होती.

**कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन**

या माध्यमाला त्यांनी ज्ञानोत्पादक, ज्ञानप्रसारक व ज्ञानवाहक केले. वृत्तपत्राच्या माध्यमातून ज्ञानाचा प्रसार करण्याचे बाळकडू पहिल्याच मराठी वृत्तपत्राच्या माध्यमातून बाळशास्त्रींनी दिल्याने त्यापुढील काळात निर्माण झालेल्या वृत्तपत्रांवर आणि वृत्तपत्रकर्त्यांवरही याचा प्रभाव दिसून येतो.

यावेळी रविंद्र बेडकीहाळ, शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. निशा मुडे-पवार, देवगड पंचायत समितीच्या सभापती जयश्री आडिवरेकर, पोंभुर्लेचे सरपंच सादिक डोंगरकर, बापूसाहेब जाधव, विजय मांडके ग्रामस्थ व पत्रकार उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JAN 2018
महाराष्ट्र टाईम्स

# कायदा जनजागृती शिबिर २३ ला

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'सामाजिक कायदे आणि कायदेविषयक योजना सर्वसामान्य माणसांपर्यंत प्रभावीपणे पोहाचाव्यात यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने कायदा जागृती शिबिराचे आयोजन केले आहे. मंगळवारी (ता. २३) स्वामी विवेकानंद महाविद्यालय परिसरात हे शिबिर पार पडणार आहे. या शिबिरातून विविध कायद्यांची माहिती नागरिकांना मिळणार आहे,' अशी माहिती विधी सेवा प्राधिकरणचे सचिव न्यायाधीश उमेशचंद्र मोरे यांनी दिली आहे.

सुप्रीम कोर्टाच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरणतर्फे सामान्य नागरिक आणि गरजूंपर्यंत न्याय पोहोचवण्याचे काम केले जाते. विधी सेवा प्राधिकरणकडील सामाजिक कायदे आणि कायदेविषयक योजनांसह सर्व शासकीय विभागाकडील कल्याणकारी तसेच विकास योजनांची माहिती एकाच छताखाली देण्याचे नियोजन केले आहे. यासाठी कायदा जागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

प्राधिकरण सचिव न्यायाधीश उमेशचंद्र मोरे म्हणाले, ' शिबिरात विधी सेवा प्राधिकरणसह अन्य शासकीय विभागांचे ३५ ते ४० स्टॉल्स असणार आहे. कल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती, तसेच विविध शासकीय योजनांतर्गत लाभार्थींना प्रातिनिधिक स्वरुपात लाभ देण्याचे नियोजनही शिबिरात केले आहे. शिबिराची सुरुवात (ता. २३) पासून होणार आहे. विवेकानंद कॉलेजच्या आवारात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश लव्हेकर, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमणार, महापालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, आदी उपस्थित राहणार आहेत.'

या कायदा जागृती शिबरात विधि सेवा प्राधिकरणसह महसूल विभाग, पोलिस दल, जिल्हा परिषद, महानगरपालिका, जिल्ह्यातील सर्व नगरपरिषदा, सामाजिक न्याय विभाग, परिवहन विभाग, महावितरण, पोस्ट, अग्रणी बँक, आदी विभागांचे स्टॉल असतील.

16 JAN 2018 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

चंद्रकांतदादा : 'अभाविप'च्या राष्ट्रीय एकात्मता यात्रेतील विद्यार्थ्यांशी संवाद

# शिक्षण, रोजगारासाठी कोल्हापूरचा विचार करा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कला-संस्कृती, क्रीडा आणि उद्योगांची जुनी परंपरा असलेले कोल्हापूर हे उत्कृष्ट शहर आहे. भविष्यात याठिकाणी येऊन शिक्षण, व्यवसाय, रोजगार करण्याची संधी साधा, असे आवाहन पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सोमवारी येथे ईशान्य भारतातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना केले.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या (अभाविप) राष्ट्रीय एकात्मता यात्रेतील विद्यार्थी-विद्यार्थिनींसमवेत पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सोमवारी सायंकाळी शासकीय विश्रामगृह येथील राजर्षी शाहू सभागृहात संवाद साधला. त्यात पालकमंत्री पाटील म्हणाले, राष्ट्रीय एकात्मता यात्रेचा उपक्रम उल्लेखनीय आहे. त्यातून संस्कृतीचे आदान-प्रदान होण्यासह एकतेचे वातावरण निर्माण होते. हे वातावरण भावल्याने 'अभाविप'चे १३ वर्षे पूर्णवेळ काम केले. यात्रेत तुम्हाला देखील निश्चितपणे विविध अनुभव येतील. ईशान्य भारतातील विविध राज्यांतून तुम्ही कोल्हापूर पाहण्यास आल्याने खूप आनंद होत आहे. आल्हाददायक वातावरण, उद्योगांची परंपरा असलेल्या कोल्हापुरात भविष्यात शिक्षण, व्यवसाय-रोजगार करण्यासाठी विचार करा. तुमचे येथे स्वागत आहे. पालकमंत्री पाटील यांनी एकात्मता यात्रेतील विद्यार्थी-विद्यार्थिनींना भेटवस्तू देऊन स्वागत केले. यावेळी पालकमंत्री पाटील यांचे ओएसडी बाळासाहेब यादव, 'अभाविप'चे पूर्वोत्तर भारत क्षेत्रीय संघटनमंत्री नीरव गिलानी, यात्रेतील मेघालयमधील विद्यार्थिनी प्रतिनिधी बीना, निर्मिती ग्राफिक्स्चे अनंत खासबारदार, यात्रेच्या स्वागत समितीचे अध्यक्ष विद्यानंद देवधर, हृषिकेश पांडे, जितेंद्र दत्त, क्रांती शेवाळे, आदी उपस्थित होते.

दीपक जाधव



कोल्हापुरात सोमवारी 'अभाविप'च्या राष्ट्रीय एकात्मता यात्रेतील विद्यार्थी-विद्यार्थिनींसमवेत पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी संवाद साधला. यावेळी डावीकडून मेघालयची विद्यार्थिनी बीना, नीरव गिलानी, एस. जी. कुलकर्णी, नरेंद्र चांदसरकर, आदी उपस्थित होते.

## एकतेची भावना वाढते

- या कार्यक्रमात अरुणाचल प्रदेशच्या पुलाई चामा याने 'अभाविप'मध्ये तुम्हाला काय चांगले वाटले?, असा प्रश्न पालकमंत्री पाटील यांना विचारला. त्यावर पालकमंत्री पाटील म्हणाले, 'अभाविप'मध्ये काम करताना एकतेची भावना वाढते. ते मला आवडले, भावल्याने घर सोडून पूर्णवेळ 'अभाविप'मध्ये काम केले. त्यानंतर पालकमंत्री पाटील यांनी एकात्मता यात्रेत सहभागी होण्यासाठी तुम्हाला आई-वडिलांनी घरातून कसे सोडले, असा प्रश्न या विद्यार्थिनींना उपस्थित केला.
- त्यावर अरुणाचल प्रदेशच्या पोपी गाव या विद्यार्थिनीने सांगितले की, इतक्या दिवसांचा प्रवास कसा करणार,असा प्रश्न माझ्या आईने उपस्थित केला होता. मात्र, सर्वजण जात असल्याने तिने परवानगी दिली. यात्रेत ज्या-ज्या ठिकाणी गेलो. तेथे आमचे उत्साहात स्वागत झाले. चांगला अनुभव आहे. कोल्हापूर खूप आवडले.

## विद्यापीठाच्या विकासासाठी कार्यरत रहा

विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांवर निवड झालेल्या अमित कुलकर्णी, यशवंत भालकर, प्रताप चिपळूणकर, संजय परमाने, नंदकुमार दिवटे, अजितकुमार पाटील, एस. जी. कुलकर्णी, जगदीश पाटणे, एस. एस. कांबळे, एन. बी. गायकवाड, जी. एस. राशिनकर यांचा पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी पालकमंत्री पाटील म्हणाले, विद्यापीठाच्या विकासासाठी कार्यरत रहा. अधिकार मंडळाच्या प्रत्येक बैठकांना उपस्थित रहा. विद्यापीठाच्या विविध घटकांचे प्रश्न सोडविण्याचे काम करा.

16 JAN 2018
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# श्रमसंस्कार शिबिरातून जीवनाला योग्य दिशा : डॉ. डी. के. गायकवाड

**हेरले / प्रतिनिधी :**

विद्यार्थ्यांना श्रमसंस्काराचे महत्त्व सांगताना या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये भावी जीवनाला योग्य दिशा मिळते, असे प्रतिपादन समन्वय राष्ट्रीय सेवा योजना शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे डॉ. डी. के. गायकवाड यांनी केले.

मौजे वडगाव, ता. हातकणंगले येथे राजर्षी छ. शाहू कॉलेज कोल्हापूर यांच्या वतीने आयोजित केलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिरप्रसंगी ते बोलत होते. श्रमसंस्कारातून शाहू, फुले, आंबेडकर यांच्यासारख्या महान व्यक्तींची निर्मिती झालेली असून, आज देशाला महासत्ता बनवण्याच्या दृष्टीने आजच्या तरुणाने आपल्या शक्तीचा आत्मविश्वासाने उपयोग केला पाहिजे, असे मत प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे यांनी व्यक्त केले. मौजे वडगाव येथे ६ ते १२ जानेवारी या कालावधीत विशेष श्रमसंस्कार शिबिर झाले. व्याख्याते एपीआय परशुराम कांबळे, पीएसआय मनीषा गबाले, प्रा. एम. एम. कांबळे, डॉ. व्ही. एम. पाटील, प्रा. आर. पी. देठे, प्रा. प्रभुदास खाबडे आदी मान्यवरांची व्याख्याने झाली.

याप्रसंगी प्रा. प्रकाश पापडीवाल, सरपंच काशिनाथ कांबळे, उपसरपंच किरण कांबळे, ग्रामविकास अधिकारी व्ही. व्ही. कांबळे, प्रा. बी. आर. पाटील, प्रा. ए. एम. विभूते, प्रा. आर. व्ही. कुंभार, प्रा. ए. एस. पाटील, प्रा. डी. बी. पाटील, प्रा. शुभांगी भंडारे, प्रा. एस. जे. माने, एनएसएसचे विद्यार्थी उपस्थित होते.

16 JAN 2018 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वीज दुर्घटना टाळण्यासाठी प्रत्येकाने दक्षता घ्यावी : मुल्ला

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विजेमुळे होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी प्रत्येकाने दक्षता घ्यावी. यामुळे अपघाताचे प्रमाण शुन्यावर येईल, असे प्रतिपादन विद्युत निरीक्षक साजिदा मुल्ला यांनी केले. शिवाजी विद्यापीठ आणि विद्युत निरीक्षक कार्यालयाच्या वतीने विद्यापीठाच्या आयसीटी ट्रेनिंग सेंटरमध्ये आयोजित विद्युत सुरक्षा सप्ताह कार्यक्रमात मुल्ला बोलत होत्या. अध्यक्षस्थानी उपकुलसचिव डॉ.व्ही.एन.शिंदे होते.

मुल्ला म्हणाल्या, विजेमुळे मानवी जीवनात अभूतपूर्व क्रांती निर्माण झालेली आहे. यामुळे होणारे संभाव्य अपघात टाळण्यासाठी वीज आणि विजेची उपकरणे हाताळण्याविषयी घरातील लहानांसह ज्येष्ठांना माहिती द्यावी. विद्युत विभागातील कर्मचाऱ्यांनी विद्युत उपकरणे हाताळताना सुरक्षेच्या सर्व साधनांचा वापर करावा. विजेची उपकरणे घरच्या घरी दुरुस्त करू नयेत. घरातील विजेचे सॉकेट मुलांचे हात पोहोचणार नाही, इतक्या उंचीवर लावावेत. ठराविक कालावधीनंतर वायरिंग बदलून घ्यावे. ओल्या हाताने विद्युत उपकरणांना स्पर्श करू नये. आयएसआय प्रमाणित उपकरणांचा वापर करावा. विजेमुळे वित्त व प्राण हानी टाळण्यासाठी योग्य ती खबरदारी वेळीच घेणे आवश्यक आहे.

यावेळी विद्युत निरीक्षक मुल्ला यांनी संभाव्य विद्युतहानी कशी टाळता येते याबद्दल चित्रफितीद्वारे सविस्तर माहिती दिली. तसेच, उपस्थितांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली.

डॉ. शिंदे म्हणाले, माणसाचे जीवन अनमोल आहे. विद्युत उपकरणे हाताळताना अत्यंत दक्ष राहावे. उपकुलसचिव डॉ. जी.एस.कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी विद्युत निरीक्षक आसमा बागवान, उपअभियंता अमित कांबळे, कनिष्ठ अभियंता व विभागप्रमुख रणजित यादव, कनिष्ठ अभियंता शिवकुमार ध्याडे आदींसह तंत्रशिक्षण अधिविभागातील विद्यार्थी, अभियांत्रिकी विभागातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

16 JAN 2018 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'ऍडव्हान्सड टेक्नॉलॉजी सेंटर'अंतर्गत रोजगार निर्मिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

पश्चिम महाराष्ट्रातील उद्योगांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबरोबरच अभियांत्रिकीतील अत्याधुनिक संशोधनाकरिता शिवाजी विद्यापीठाने औरंगाबाद येथील इंडो जर्मन टुल रूम यांच्याबरोबर सामंजस्यकरार केला आहे. या करारांतर्गत तंत्रज्ञान अधिविभागात 'एडव्हान्सड टेक्नॉलॉजी सेंटर-ए सेंटर फॉर ट्रेनिंग रिसर्च अँड डेव्हलपमेंट' ची स्थापना केली आहे. या सेंटरच्या प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ झाला आहे. उद्योग क्षेत्रासह दहावी उत्तीर्ण ते पदव्युत्तरपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कौशल्यावर आधारित प्रशिक्षण देऊन स्थानिकांना रोजगाराभिमुख शिक्षण देवून उद्योगांना कुशल मनुष्यबळ देण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.

स्थानिक उद्योगाला पूरक मनुष्यबळ देवून रोजगारक्षमता वाढण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे. 'ऍडव्हान्सड टेक्नॉलॉजी सेंटर'च्या माध्यमातून कोल्हापुरातील उद्योगांना आवश्यक 'नीड बेस्ड कोर्सेस' अभ्यासक्रम सुरू करण्यात आले असून या अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्यांची संख्या वाढत आहे. भारत सरकारच्या एम.एस.एम. ई. मंत्रालयाअंतर्गत इंडो जर्मन टूल रूम औरंगाबादच्या सहाय्याने अप्लाईड कोर्स सुरू केले आहेत. भारत सरकारच्या स्टार्टअप प्रकल्पाअंतर्गत प्रगत संशोधनाची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

स्थानिक उद्योगाला पूरक मनुष्यबळ देवून रोजगारक्षमता वाढण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे. या सेंटरच्या माध्यमातून कोल्हापुरातील उद्योगांना आवश्यक 'नीड बेस्ड कोर्सेस' अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. भारत सरकारच्या एम. एस.एम.ई. मंत्रालयाअंतर्गत इंडो जर्मन टूल रूम औरंगाबादच्या सहाय्याने अप्लाईड कोर्स सुरू केले आहेत. भारत सरकारच्या स्टार्ट अप प्रकल्पाअंतर्गत प्रगत संशोधनाची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. या अभ्यासक्रमांतर्गत प्रशिक्षण घेवून महिलाही घरबसल्या अनेक व्यवसाय करू शकतात. तसेच एखाद्या कंपनीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला येथील अभ्यासक्रमाचा आपल्या दैनंदिन कामकाजात चांगला फायदा होवू शकतो. तसेच आपल्या कामाशी मिळता-जुळता एखादा व्यवसाय घरातही सुरू करता येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JAN 2018
पुढारी

# विद्यापीठात 'महात्मा फुले व सार्वजनिक सत्यधर्म' विषयावर आज व्याख्यान

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठामध्ये 'महात्मा फुले व सार्वजनिक सत्यधर्म' या विषयावर डॉ. अरुण शिंदे यांचे व्याख्यान मंगळवार (दि. १६) जानेवारी रोजी दुपारी तीन वाजता आयोजित केले आहे. आजीवन अध्ययन व विस्तार अधिविभागामार्फत कै. पी. बी. साळुंखे व्याख्यानमालेंतर्गत शिक्षणशास्त्र अधिविभागामध्ये कार्यक्रम होणार आहे.

यावेळी विद्यापीठाचे मराठी अधिविभागप्रमुख डॉ. राजन गवस अध्यक्षस्थानी उपस्थित राहणार आहेत. व्याख्यानास उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. सुमन बुवा यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JAN 2018
लोकमत

# विद्यापीठात आज अरुण शिंदे यांचे व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार अधिविभागामार्फत पी. बी. साळुंखे व्याख्यानमालेअंतर्गत 'महात्मा फुले व सार्वजनिक सत्यधर्म' या विषयावर आज, मंगळवारी दुपारी तीन वाजता शिक्षणशास्त्र अधिविभागामध्ये व्याख्यान होणार आहे. यात नाईट कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्सचे डॉ. अरुण शिंदे हे प्रमुख वक्ते आहेत. यावेळी विद्यापीठाचे मराठी अधिविभागप्रमुख डॉ. राजन गवस अध्यक्षस्थानी उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती आजीवन अध्ययन व विस्तार अधिविभागाच्या प्रभारी संचालक डॉ. सुमन बुवा यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JAN 2018
महाराष्ट्र टाईम्स

## डॉ. शिंदेंचे उद्या व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार अधिविभागामार्फत नाईट कॉलेजचे प्रा. डॉ. अरुण शिंदे यांचे उद्या (बुधवार) व्याख्यान होणार आहे. कै. पी. बी. साळुंखे व्याख्यानमालेंतर्गत 'महात्मा फुले व सार्वजनिक सत्यधर्म' या विषयावर दुपारी तीन वाजता शिक्षणशास्त्र विभागात व्याख्यान होईल. यावेळी विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. राजन गवस अध्यक्षस्थानी उपस्थित राहणार आहेत. प्र.संचालक व विभागप्रमुख डॉ. सुमन बुवा यांनी ही माहिती दिली आहे.

16 JAN 2018
Times of India

# SUK's 100% compliance for MIS data

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has achieved 100% compliance rate for submission of Management Information System (MIS) this year.

According to SUK's nodal officer for MIS Abhijeet Redekar, the academic data for 2017-18 has been submitted by the university. "As many as 203 colleges have submitted their information under the MIS. The remaining 80 college do not have to send their information as they are associated with the Directorate of Technical Education," he said.

He added that the varsity's performance in the data submission in past few years has been exceptional and they have received appreciation from higher authorities for the same.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JAN 2018
पुढारी

# स्टुडंट्स कौन्सिलची अंतिम यादी आज

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शैक्षणिकवर्ष २०१७-१८मधील स्टुडंट्स कौन्सिलच्या निवडणुका गुणवत्तेनुसार घेण्यात याव्यात, असा अध्यादेश काढला आहे. यानिमित्ताने शिवाजी विद्यापीठाने स्टुडंट्स कौन्सिलचा कार्यक्रम जाहीर केला आहे. या प्रक्रियेसाठी आता विविध महाविद्यालयांतील वर्ग प्रतिनिधींनी अर्ज भरले आहेत. यानुसार आता मंगळवारी या प्रतिनिधींची अंतिम यादी जाहीर होणार आहे. आज सर्वच महाविद्यालयांत धावपळ उडाली होती. अनेक ठिकाणी याबाबतची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.

16 JAN 2018 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्युदो स्पर्धेत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची दमदार कामगिरी

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय, महाविद्यालयीन ज्युदो स्पर्धेत विविध महाविद्यालयांमधील ज्युदोपटूंनी ५ सुवर्ण, २ रौप्य व १ कास्यं पदक पटकावले. शिवाजी विद्यापीठाच्या नागेशकर जिम्नॅशिअम हॉलमध्ये ही स्पर्धा झाली.

स्पर्धेत सचिन पाटीलने (स. ब. खाडे महाविद्यालय) ५६ किलोत, रणवीर भोसलेने (विवेकानंद कॉलेज) ६० किलोत, सिद्धार्थ साळोखेने (सायबर) ७३ किलोत, शाहरुख मुल्लाणीने ८१ किलोत, शंकर चौगुलेने १०० किलोत (दोघे शहाजी कॉलेज) सुवर्ण पदक मिळवले. पार्थ पाटीलने (न्यू कॉलेज) ६६ किलोत, तर अजिम काझीने (शहाजी कॉलेज) ९० किलोत रौप्य पदक तर अवधुत पाटीलने (न्यू कॉलेज) कास्यं पदक मिळवले. यापैकी सुवर्ण पदक पटकावलेल्या सचिन, रणवीर, सिद्धार्थ, शाहरुख व शंकरची चंदीगड येथे होत असलेल्या अखिल भारतीय विद्यापीठस्तरीय ज्युदो स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे. वरील सर्व ज्युदोपटू हे मिरजकर तिकटी येथील न्यू ज्युदो प्रशिक्षण केंद्रात सराव करत आहेत. त्यांना केंद्राचे अध्यक्ष लालासाहेब गायकवाड, शरद पोवार, अमित भोसले यांचे मार्गदर्शन लाभत आहे.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महाविद्यालयीन ज्युदो स्पर्धेतील यशस्वी ज्युदोपटूंसमवेत लालासाहेब गायकवाड, शरद पोवार, अमित भोसले आदी.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JAN 2018
पुण्यनगरी

# आंतरविद्यापीठ फेन्सिंग स्पर्धेसाठी संघ रवाना

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** गुरुनानक देव विद्यापीठ, अमृतसर येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फेन्सिंग (तलवारबाजी) स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ रवाना झाला. ही स्पर्धा १७ ते १९ जानेवारीदरम्यान होणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या संघामध्ये अक्षय देशमुख, मोरेश्वर पाटील, प्रतीक जाधव, ओंकार पाटील, श्रेयस कुऱ्हाडे, प्रतीक संकपाळ, राम यादव, यश कोळी आदींचा समावेश आहे. त्यांना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. पी. टी. गायकवाड, प्रा. राहुल मगदूम, प्रा. धनंजय पाटील, विक्रम नांगरे-पाटील आदींचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JAN 2018
महाराष्ट्र टाईम्स

# तलवारबाजीसाठी विद्यापीठ संघ रवाना

**कोल्हापूर :** गुरुनानक देव विद्यापीठ अमृतसर येथे १७ ते १९ जानेवारीदरम्यान होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ तलवारबाजी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघाची निवड झाली आहे. संघ अमृतसरला रवाना झाला.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांत आंतरराष्ट्रीय खेळाडू अक्षय देशमुख, राष्ट्रीय खेळाडू मोरेश्वर पाटील, प्रतीक जाधव, ओंकार पाटील, राज्यस्तरीय पदक विजेता श्रेयश कुऱ्हाडे, प्रतीक संकपाळ, राम यादव, यश कोळी यांची निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव विलास नांदवडेकर, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. पी. टी. गायकवाड, प्रा. राहुल मगदूम यांचे मार्गदर्शन लाभले.